ePaper

## दिल्लीत महायुतीच्या जागांचा फॉर्म्युला ठरणार!



|| वर्ष - 8 । अंक -99 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- देशात प्रथमच बायोप्लॅस्टिकची निर्मिती!
- शेकडो युवक-युवतींचा १०० टक्के मतदानाचा निर्धार!
- १२ विमानांना बॉम्बने उडवण्याची धमकी!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 17 ऑक्टोंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार अशी लढत होणार

# बारामतीचा निर्णय कधी ?

## निवडणुका जाहीर झाल्यानंतर युगेंद्र पवारांचे मोठे वक्तव्य

। बारामती । महाईन्यूज

**राज्यातील विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या कार्यक्रमानुसार राज्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होईल तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होतील. विधानसभा निवडणुकीची चर्चा सुरू झाल्यापासून बारामती विधानसभेत काय होणार याबद्दल सर्वांना उत्सुकता होती. गेल्या काही दिवसांपासून अजित पवार या मतदारसंघातून निवडणूक लढवणार की नाही याबाबत चर्चा सुरू होती. अजित दादाच बारामतीतून लढणार यावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर आता येथे अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार अशी लढत होणार हे जवळ जवळ निश्चित मानले जात आहे.**



निवडणुका जाहीर झाल्यानंतर शरद पवार गटाचे संभाव्य उमेदवार युगेंद्र पवार यांनी मोठे वक्तव्य केले आहे. निवडणुका जाहीर होण्यासाठी बरेच दिवस थांबलो होतो. आता त्याची घोषणा झाली ही चागंली गोष्ट आहे. या आठवड्यात शरद पवार बारामती जागेबाबत निर्णय जाहीर करतील असे ते म्हणाले.

### तुतारी आणि पिपाणी चिन्ह

लोकसभेला तुतारी चिन्ह नवीन होते. त्यावेळी पिपाणी चिन्हाला तुतारी नाव देण्यात आले होते.आता पिपाणी चिन्हा खाली पिपाणी आणि तुतारी चिन्हाखाली तुतारी असे लिहिले जाणार आहे. यामुळे थोडासा त्रास होईल मात्र जास्त फरक पडणार नाही, असे युगेंद्र पवार म्हणाले.

### अजित पवारांविरुद्ध लढणार?

बारामती विधानसभेत पवार विरुद्ध पवार अशी लढाई होणार का? याबाबत विचारले असता युगेंद्र पवार म्हणाले, ही लढाई पवार विरुद्ध पवार होईल का हे मला माहिती नाही. सध्या आमच्या दौऱ्याला चांगला प्रतिसाद मिळतोय. आणखी काम करण्याची ऊर्जा मिळत आहे. तालुक्यातील वाड्यावर वस्त्यांवर आम्ही फिरलो आहे. यामुळे बारामतीकर पवार साहेबांना विसरणार नाहीत याची खात्री आम्ही बाळगतो, असे सुचक वक्तव्य त्यांनी केले.

### बारामतीत समस्या

बारामतीसह राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचे सांगत युगेंद्र पवार यांनी बारामतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढल्याचा गंभीर आरोप केला. मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न अद्याप अपूर्ण आहे. याबाबत अनेक प्रश्न आहेत जे सोडवण्यावर आम्ही भर देऊ असे ते म्हणाले.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेतील ४३७ अधिकारी, कर्मचाऱ्यांना अभय?

### ‘अ’ ते ‘ड’ संवर्गातील जे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना आचारसहिंतेमुळे स्थगिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महापालिकेत वर्षानुवर्षे एकाच जागी नेमणुकीस असलेल्या ४३७ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी करण्यात येतील, असे प्रशासनाने जाहीर



केले होते. मात्र, प्रत्यक्षात बदल्या न झाल्याने संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अभय मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिका सेवेतील ‘अ’ ते ‘ड’ संवर्गातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात २०१५ मध्ये धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार एप्रिल व मे महिन्यात बदल्या करणे अपेक्षित असते. मात्र, लोकसभा निवडणुका असल्याने कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या झाल्या नव्हत्या. त्यानंतर आयुक्त शेखर सिंह यांनी ‘अ’ ते ‘ड’ संवर्गातील जे अधिकारी, कर्मचारी हे एप्रिल व मे २०२४ या महिन्यात बदलीस पात्र ठरत होते. त्यांची आणि ज्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना वैयक्तिक, वैद्यकीय कारणास्तव बदली पाहिजे अशा कर्मचाऱ्यांची माहिती मागविली होती. त्यानुसार विभागप्रमुखांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह बदलीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे आठ ऑगस्ट रोजी सादर केली.

### आता निवडणुकीनंतरच बदल्या

विधानसभा निवडणुकीसाठी महापालिकेतील विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे आचारसंहिता कालावधीत बदल्यांचा निर्णय घेणे शक्य नाही. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीनंतरच अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा निर्णय होण्याची शक्यता असल्याचे सामान्य प्रशासन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# देशात प्रथमच बायोप्लॅस्टिकची निर्मिती!

## प्राज इंडस्ट्रीजला यश; प्रात्यक्षिक सुविधेचे उद्घाटन

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्राज इंडस्ट्रीजच्या वतीने बायोपॉलिमरसाठीची देशातील पहिली व एकमेव अशी प्रात्यक्षिक सुविधा सुरू करण्यात आली आहे. एकात्मिक तंत्रज्ञानाने विकसित करण्यात आलेल्या पॉलिलॅक्टिक ॲसिड तंत्रज्ञानाद्वारे जैवविघटनशील अशा बायोप्लॅस्टिकची निर्मिती करण्यात येणार असल्याची माहिती प्राजचे अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांनी बुधवारी दिली.**




पुण्याजवळील जेजुरीमध्ये उभारण्यात आलेल्या या सुविधेचे उद्घाटन केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान खात्याचे राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांच्या हस्ते नुकतेच झाले. केंद्र सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. राजेश गोखले, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक डॉ. आशिष लेले आदी या वेळी उपस्थित होते. या अत्याधुनिक प्रात्यक्षिक सुविधेमध्ये पॉलिलॅक्टिक ॲसिड हा पहिलाच विभाग असून, याशिवाय किण्वन, रासायनिक संश्लेषण, विलगीकरण आणि शुद्धीकरण यांसारखे इतर सहायक विभागही उभारण्यात आले आहेत. एकूण तीन एकर परिसरात ही सुविधा असून, यामध्ये वर्षाला १०० टन लॅक्टिक ॲसिड, ६० टन लॅक्टाईड आणि समतुल्य प्रमाणात ५५ टन पॉलिलॅक्टिक ॲसिडचे उत्पादन घेणे शक्य आहे.याबाबत डॉ. चौधरी म्हणाले, की औद्योगिक जैवतंत्रज्ञानात अग्रणी संस्था म्हणून काम करीत असताना चक्रीय अर्थव्यवस्था व जैवआधारित उत्पादनांकडे असलेला जागतिक रोख ओळखून प्राज इंडस्ट्रीजने नजीकच्या काळातील बायोरिफायनरीजचे महत्त्व ओळखले. जैव गतिशीलतेसोबतच जैवइंधन उद्योगात कंपनीने नेतृत्वही प्रस्थापित केले. या कौशल्य व अनुभवाच्या जोरावर प्राजने आपल्या बायो-प्रिझम पोर्टफोलिओद्वारे रिन्युएबल केमिकल्स आणि मटेरिअल्समध्ये (आरसीएम) धोरणात्मकदृष्ट्या विविधता आणली, तेव्हापासून आजवर प्राजने आपल्या प्राज मॅट्रिक्स संशोधन व विकास केंद्रात बायोप्लॅस्टिकला महत्त्व देत पॉलिलॅक्टिक ॲसिड (पीएलए) तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिला.प्राज इंडस्ट्रीजने विकसित केलेल्या तंत्रज्ञानामुळे साखर कारखाने बायोप्लॅस्टिकची निर्मिती करू शकतात. बायोप्लॅस्टिकची निर्मिती कच्च्या साखरेपासून कारखान्यांना करता येईल. यातून त्यांना उत्पन्नाचा नवीन स्रोत उपलब्ध होईल. यातून प्लॅस्टिकला पर्याय निर्माण होऊन त्यामुळे होणारे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.पुण्याजवळील जेजुरीमध्ये उभारण्यात आलेल्या या सुविधेचे उद्घाटन केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान खात्याचे राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांच्या हस्ते नुकतेच झाले.

### वर्षाला 100 टन लॅक्टिक ॲसिड

या अत्याधुनिक प्रात्यक्षिक सुविधेमध्ये पॉलिलॅक्टिक ॲसिड हा पहिलाच विभाग असून, याशिवाय किण्वन, रासायनिक संश्लेषण, विलगीकरण आणि शुद्धीकरण यांसारखे इतर सहायक विभागही उभारण्यात आले आहेत. एकूण तीन एकर परिसरात ही सुविधा असून, यामध्ये वर्षाला १०० टन लॅक्टिक ॲसिड, ६० टन लॅक्टाईड आणि समतुल्य प्रमाणात ५५ टन पॉलिलॅक्टिक ॲसिडचे उत्पादन घेणे शक्य आहे.याबाबत डॉ. चौधरी म्हणाले, की औद्योगिक जैवतंत्रज्ञानात अग्रणी संस्था म्हणून काम करीत असताना चक्रीय अर्थव्यवस्था व जैवआधारित उत्पादनांकडे असलेला जागतिक रोख ओळखून प्राज इंडस्ट्रीजने नजीकच्या काळातील बायोरिफायनरीजचे महत्त्व ओळखले.

# प्रेमप्रकरणातून चाकणमधील तरुणाची आत्महत्या

## खोल दरीत आढळला मृतदेह, दोन सेकंदाच्या व्हिडिओवरून काढला माग

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील चाकण मधील २७ वर्षीय तरुणाने प्रेम प्रकरणातून लोणावळ्यातील राजमाची दरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना उजेडात आली आहे. सूर्यकांत रामदयाल प्रजापती या तरुणाचा मृतदेह तब्बल ३७० फूट खोल दरीत आढळला आहे. सूर्यकांतने आत्महत्या करण्यापूर्वी अवघ्या दोन सेकंदाचा व्हिडिओ बनवून तो घरी ठेवलेल्या मोबाईलवर पाठवला होता.**

याच व्हिडिओद्वारे आणि लोकेशन वरून लोणावळा शिवदुर्गच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने मृतदेहाचा शोध घेऊन आज बुधवारी बाहेर काढला आहेपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सूर्यकांत प्रजापती या २७ वर्षीय तरुणाचं चाकणमधील तरुणीबरोर प्रेमप्रकरण सुरू होतं. प्रियकर सूर्यकांतला त्याच्या प्रेयसीचं दुसऱ्या तरुणाशी प्रेमप्रकरण असल्याचा संशय होता. याच संशयामुळे नैराश्यात असलेला सूर्यकांत ०९ ऑक्टोबर रोजी घर सोडून गेला. त्यानंतर तो घरी परतलाच नाही. सुर्यकांत दुसऱ्या दिवशीही घरी न परतल्याने त्याच्या कुटुंबीयांनी चाकण पोलीस ठाण्यात तो बेपत्ता असल्याची तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला..पोलिसांनी तांत्रिक तपास केल्यानंतर सूर्यकांतचं शेवटचं लोकेशन हे लोणावळा असल्याचं





त्यांच्या निदर्शनास आलं. चाकण पोलीस आणि लोणावळा पोलीस घटनस्थळी गेले. तिथे काही धागेदोरे हाती लागतात का? हे तपासण्याचा प्रयत्न केला. मध्यंतरी लोणावळ्यात खूप पाऊस असल्याने शोधमोहीम घेणं शक्य नव्हतं. टप्प्याटप्याने शोध घेण्यात आला. सूर्यकांतने आत्महत्या करण्यापूर्वी अवघ्या दोन सेकंदाचा सेल्फी व्हिडिओ चित्रित केला होता.या व्हिडीओमध्ये त्याच्या पाठीमागची हिरवीगार झाडी आणि दरी स्पष्ट दिसत होती. सूर्यकांतने त्याचा दुसरा मोबाईल घरी ठेवला होता. त्याने त्यावर तो व्हिडिओ पाठवला होता. यावरून पोलीस त्याचा शोध घेत होते.

सूर्यकांतला शोधण्याचं मोठं आव्हान पोलीस आणि शिवदुर्गच्या पथकापुढे होतं. लोणावळा शिवदुर्ग पथक देखील यावरून लोकेशनची जुळवाजुळव करत होतं. अखेर तो व्हिडिओ राजमाची येथील असल्याचं समोर आलं. व्हिडीओमध्ये पाठीमागे दिसत असलेला भाग तिथला असल्याचं स्पष्ट झालं. अखेर आज सकाळी पुन्हा शोध मोहीम सुरू केली. दरीत काही फुटांवर सूर्यकांतचा मोबाईल दिसला. आणखी खाली गेल्यानंतर मृतदेहाची दुर्गंधी आली. मृतदेह त्याचा असल्याचं निश्चित झालं. राजमाची दरीत तब्बल ३७० फुटांवर सूर्यकांत चा मृतदेह आढळला.

सात दिवसांनंतर सूर्यकांत चा शोध लागला होता. प्रेम प्रकरणातून सूर्यकांतने आत्महत्या केल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. शिवदुर्गचे सुनील गायकवाड यांच्या पथकाने त्याचा मृतदेह शोधला. पोलिसांच्या मदतीने मृतदेहाचा शोध घेऊन आज बुधवारी बाहेर काढला आहेपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सूर्यकांत प्रजापती या २७ वर्षीय तरुणाचं चाकणमधील तरुणीबरोर प्रेमप्रकरण सुरू होतं. प्रियकर सूर्यकांतला त्याच्या प्रेयसीचं दुसऱ्या तरुणाशी प्रेमप्रकरण असल्याचा संशय होता.

### टप्प्याटप्याने शोध घेण्यात आला

याच संशयामुळे नैराश्यात असलेला सूर्यकांत ०९ ऑक्टोबर रोजी घर सोडून गेला. त्यानंतर तो घरी परतलाच नाही. सुर्यकांत दुसऱ्या दिवशीही घरी न परतल्याने त्याच्या कुटुंबीयांनी चाकण पोलीस ठाण्यात तो बेपत्ता असल्याची तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला..पोलिसांनी तांत्रिक तपास केल्यानंतर सूर्यकांतचं शेवटचं लोकेशन हे लोणावळा असल्याचं त्यांच्या निदर्शनास आलं. चाकण पोलीस आणि लोणावळा पोलीस घटनस्थळी गेले. तिथे काही धागेदोरे हाती लागतात का? हे तपासण्याचा प्रयत्न केला. मध्यंतरी लोणावळ्यात खूप पाऊस असल्याने शोधमोहीम घेणं शक्य नव्हतं. टप्प्याटप्याने शोध घेण्यात आला.

## महापालिकेच्या स्वीप उपक्रमांतर्गत मतदानाची घेतली शपथ

# शेकडो युवक-युवतींचा 100 टक्के मतदानाचा निर्धार!

### लोकशाहीच्या उत्सवामध्ये सहभागी होऊन तरुणाईने राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याचे आवाहन

।पिंपरी-चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज

**युवा पिढी देशाचे भवितव्य घडवत असते. समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडवण्याचे सामर्थ्य युवकांमध्ये आहे. आपल्या पिंपरी-चिंचवड शहरामध्ये शिक्षण, नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणामध्ये तरुण पिढी वास्तव्यास आहे. येत्या विधानसभा निवडणुकांमध्ये युवकांनी स्वत: मतदान करावे तसेच आपले कुटुंब, मित्रपरिवार यांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करून त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे. लोकशाहीच्या उत्सवामध्ये सहभागी होऊन तरुणाईने आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन उपायुक्त तथा स्वीपचे नोडल अधिकारी अण्णा बोदडे यांनी केले. ते युथ आयकॉन २०२४ स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभामध्ये बोलत होते.**



युवक-युवतींमधील कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी स्वीप उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि., एल्प्रो सिटी स्क्वेअर मॉल आणि रिलायन्स स्मार्ट बझार यांच्या वतीने युथ आयकॉन २०२४ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. युथ आयकॉन स्पर्धेमध्ये ४५० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग घेतला असून त्यांना २० हजारांपेक्षा जास्त नागरिकांनी ऑनलाईन सहभाग घेतला आहे. ही स्पर्धा पीसीएमसी स्मार्ट सारथी सिटीझन एंगेजमेंट उपक्रमाच्या अंतर्गत आयोजित करण्यात आली आहे.

यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, एल्प्रो सिटी इंटरनॅशनल लि.चे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक दीपक कुमार, एल्प्रो सिटी स्वेअरचे सेंटर डायरेक्टर निशांत कन्सल, रिलायन्स स्मार्ट बाजारचे स्टेट मार्केटींग हेड मनोज भडके उपस्थित होते. विशाखा शेरे, मनीष मिश्रा, प्रियांका बायांना यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. या कार्यक्रमासाठी नामांकित कलाकार उपस्थित होते. छत्रपती संभाजी महाराज चित्रपटामधील कलाकार स्वराज भोईटे, शीतल पाटील हे यावेळी उपस्थित होते. तसेच पियुष सजगने, ज्योती सेतसंधी, अक्षय पंडागळे यांनी देखील कार्यक्रमामध्ये आपली उपस्थिती नोंदवली.

युथ आयकॉन २०२४ स्पर्धेची अंतिम फेरी आणि बक्षीस वितरण समारंभ मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजता एल्प्रो सिटी मॉल, चिंचवड येथे आयोजित करण्यात आला होता. अत्यंत उत्साही वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध कलाप्रकार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनुष्का आणि सहकाऱ्यांनी गणेश वंदना सादर केली. त्यांनतर स्पर्धकांनी फॅशन शोमध्ये सादरीकरण केले.

#### स्पर्धेसाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार

यावेळी यशस्वी स्पर्धक आणि स्पर्धेसाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. रील्स श्रेणीमध्ये उन्मेष कदम (प्रथम क्रमांक), श्रीकांत रहाणे(द्वितीय क्रमांक) शुभम वारंगुळे (तृतीय क्रमांक) यांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. युथ आयकॉन विजेते (मुले) श्रेणीमध्ये अभय शिंदे(प्रथम क्रमांक), युवराज चव्हाण(द्वितीय क्रमांक), जीवन करंडे (तृतीय क्रमांक) यांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. युथ आयकॉन विजेते (मुली) श्रेणीमध्ये अनुष्का मुकरे(प्रथम क्रमांक), सानिका चोरागी(द्वितीय क्रमांक), पूजा सनके(तृतीय क्रमांक) यांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. एस. बी. पाटील कॉलेज ऑफ मॅनेजमेंट महाविद्यालयाला सर्वांत जास्त विद्यार्थी सहभाग पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अभय शिंदे यांना पीपल्स चॉइस अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला सहकार्य केल्याबद्दल एल्प्रो सिटी स्क्वेअर आणि एनएफआयडी यांचा सत्कार करण्यात आला.

---

# भोसरी विधानसभेत बदल घडविण्यासाठी यंत्रणा सज्ज !

### अजित गव्हाणे : भोसरीमध्ये मविआचा आमदार होणार, केंद्र व बूथ प्रमुखांच्या बैठकीत कार्यकर्त्यांची दिसली एकजूट

।पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी : निवडणुकीमध्ये केंद्र व बुथ प्रमुखांची जबाबदारी महत्वपूर्ण असून बुथ यंत्रणा सक्षम असेल तरच निवडणूक जिंकणे सोपे होते, त्यामुळे कार्यकर्त्यांनी बूथ यंत्रणेची जबाबदारी आत्मविश्वासाने पार पाडावी असे आवाहन स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले. आपली बूथ यंत्रणा सक्षम आहे. आता केंद्रप्रमुख या संरचनेप्रमाणे आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचे आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर जो उमेदवार अधिकृतरित्या निवडणुकीला सामोरा जाणार आहे. त्यामागे ही यंत्रणा उभी करून भोसरी विधानसभेत आपल्याला बदल घडवायचा आहे. महाविकास आघाडीमध्ये एकजूट असून या एकजुटीतून भोसरी विधानसभेत महाविकास आघाडीचाच आमदार होणार असल्याचेही अजित गव्हाणे म्हणाले.**



इंद्रायणीनगर येथील पर्ल बँक्वेट हॉल येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने बूथ व केंद्रप्रमुख, पदाधिकारी, माजी नगरसेवक यांची बैठक (दि. 15) पार पडली. त्यावेळी अजित गव्हाणे बोलत होते. यावेळी महाविकास आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजित गव्हाणे यावेळी म्हणाले, प्रत्येक बुथ कार्यकर्त्यांनी गांभीर्याने घेऊन निवडणुकीची जबाबदारी पार पाडायची आहे. निवडणुकीची लढाई ही नेहमी कार्यकर्त्यांच्या जीवावर लढली जाते.

कार्यकर्ते हाच निवडणुकीचा खरा कणा असतो. आपली बुथ यंत्रणा सक्षम आहे मात्र आता केंद्रप्रमुख या संरचनेप्रमाणे आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचे आहे. राज्यात निवडणुकांचे बिगुल वाजले असून राज्यात निवडणुका देखील जाहीर झाल्या आहेत. त्यामुळे एकजुटीने कामाला लागायचे आहे.

#### परिवर्तनाच्या लढाईतून बदल घडवायचा...

भोसरी मतदारसंघांमध्ये परिवर्तनाची लढाई आपण सुरू केली असल्याचे सांगून अजित गव्हाणे म्हणाले, भोसरी मतदारसंघातील भ्रष्टाचार, दडपशाही यामुळे येथील प्रत्येक नागरिक कंटाळलेला आहे. येथील प्रत्येक कामातील भ्रष्टाचार अनेक गैरसोयींसाठी कारणीभूत ठरत आहे. मतदार संघातील चहुबाजूच्या वाहतूक कोंडीने अक्षरशः येथील नागरिक मेटाकुटीला आला आहे..या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपल्याला परिवर्तन घडवायचे आहे.



भूमिका

**सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला दहा दिवस उलटले तरी सत्ताधारी निव्वळ दबावतंत्रच वापरत आहेत. वांगचुक यांनी कमावलेल्या हिमालयीन ज्ञानाचा हा अपमान किती काळ सुरू राहाणार? सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखालील ऐतिहासिक लेह ते दिल्ली पदयात्रा ही दिवंगत नेते आणि राजकीय विचारवंत राममनोहर लोहिया यांनी धरलेल्या 'भारताला निश्चित असे 'हिमालय-धोरण' हवे.**

# हिमालयची हाक दिल्लीस ऐकू जाते का

वास्तविक जेव्हा चीन-भारत सीमेवरील नागरिकांचा एक गट महिनाभर चालून, एक हजार किलोमीटरचे अंतर पायी पार करून राजधानी नवी दिल्लीत पोहोचला, तेव्हा तरी त्यांच्या- पर्यायाने लडाख भागाच्या- मागण्यांकडे केंद्र सरकारने साकल्याने पाहाणे आवश्यक होते. त्याऐवजी, अचानक भादंविचे कलम १४४ (आता भानासुसं- १६३) लादणे, कोणतेही कारण नसताना ताब्यात घेणे, लडाख भवन येथे अनौपचारिक नजरकैदेत ठेवणे आणि उपोषण करण्यासाठी जागाही नाकारणे अशा प्रकारे केंद्रीय यंत्रणा वागल्या. उपोषणाच्या आठव्या दिवशी वांगचुक यांनी, इतरांनाही यात सामील होण्याचे आमंत्रण दिले असताना दिल्ली पोलिसांनी पुन्हा धडक दिली आणि अनेक समर्थकांना ताब्यात घेतले. लडाखमधील लोकांचे हे आंदोलन गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू



आहे, 'लेह अॅपेक्स बॉडी' आणि 'कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स' या संघटना त्यात गुंतल्या आहेत, याकडे केवळ दिल्लीतल्या सत्ताधाऱ्यांचेच नव्हे तर न्यायप्रेमी भारतीयांचेही लक्ष नसावे, हे खेदनजक आहे. लडाखमधले हे आंदोलन आपल्या एकंदर हिमालयीन प्रदेशात अलीकडे घडलेल्या अनेक घटनांपैकी एक आहे. जम्मू-काश्मीरसाठीचा अनुच्छेद ३७० रद्द करून त्या राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांत विखंडन, उत्तराखंडमध्ये प्रचंड भूस्खलन, नेपाळमधील सत्ताबदल, सिक्कीममध्ये आलेला पूर, भूतानची चीनशी जवळीक, आसाममध्ये एनपीआर-विरोधी आंदोलने आणि मणिपूरमध्ये वर्षभरानंतरही धुमसणारा हिंसाचार. या घटनांचे लगोलग वर्गीकरण करण्याची सवयच आपल्याला झाली आहे... या घटनांचेही भू-राजकारण, दहशतवाद, अंतर्गत सुरक्षा, नैसर्गिक आपत्ती, वांशिक हिंसाचार इत्यादी शीर्षकांखाली वर्गीकरण होतच राहिले, पण वास्तविक यामागची काहीएक संगती शोधण्याची गरज आहे. ७० वर्षांपूर्वी राममनोहर लोहिया यांनी हिमालयातील या राज्यांमधील परस्परसंबंध आणि त्यांचे प्रश्न ओळखून एकात्मिक दृष्टिकोन बाळगण्यास सांगितले होते. पश्चिमेकडील पख्तूनिस्तानपासून पूर्वेकडील म्यानमारपर्यंत संपूर्ण हिमालयीन प्रदेशाचा समावेश असलेल्या ठिकाणांबद्दल आणि लोकांबद्दल, भारताने एक सुसंगत आणि लोकशाही दृष्टिकोन विकसित करावा अशी लोहियांची इच्छा होती. स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या वर्षांत, चिनी आक्रमणाचा धोका मोठ्या प्रमाणात वाढत असताना 'एकात्मिक हिमालय धोरणा' लोहिया यांची मुख्य चिंता राजकीय होती. बाह्य आणि अंतर्गत आव्हाने एकमेकांशी कशी जोडली गेली आहेत, याचे केवळ विवेचन न करता लोहिया स्वत: भारतातील आणि तिबेट तसेच नेपाळमधील लोकांच्या लोकशाही हक्कांसाठी उभे राहिले. 'तिबेट आणि नेपाळमधील शासकांविरुद्धच्या लोक-लढ्याला भारताने पाठिंबा द्यावा' अशी स्पष्ट भूमिका तर त्यांनी घेतलीच. शिवाय, काश्मीर आणि नागालँडमधील तत्कालीन 'बंडखोरां'ना लोकशाहीच्या प्रक्रियेत आणण्यासाठी त्यांच्याशी संवाद करायला हवा, अशी बाजूही मांडली. त्या वेळी पंतप्रधान नेहरूंनी मानवंशशास्त्रज्ञ आणि मध्य भारतातल्या आदिवासी समूहांचे गाढे अभ्यासक व्हेरिअर एल्विन (हे जन्माने ब्रिटिश होते), यांना ईशान्य भारतातील आदिवासी भागांविषयीचे विशेष सल्लागार म्हणून नेमले होते; त्या एल्विन-प्रणीत आदिवासी धोरणाला लोहियांनी कडाडून विरोध केला. ईशान्येकडील आदिवासींचे बिगर-आदिवासींपासून सामाजिक आणि अन्य सर्वच दृष्टीने पृथक्करण करावे- म्हणजे आदिवासींना निराळे जिल्हे द्यावेत आदी सूचना या एल्विन यांनी केला होता. लोहिया नेहरूविरोधक म्हणून ओळखले जातात.आणि भारतावरील आक्रमणाच्या मनसुब्यांकडे डोळेझाक करणाऱ्या नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावर लोहियांनी प्रथमपासूनच टीका केली.

## संपादकीय »

### 'मेक इन' मंदावले

***पीएलआय'सारख्या नावीन्यपूर्ण योजनांमुळे उत्पादन वाढले; परंतु अशा अनुदानाधारित उद्योगांबाबत तज्ज्ञांचे म्हणणे काय?***

विख्यात अर्थतज्ज्ञ अमेरिकावासी जगदीश भगवती हे काही अमर्त्य सेन यांच्याप्रमाणे भारत सरकारचे टीकाकार नव्हेत. उलट आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या मान्यवरांनी विकासाचे 'गुजरात प्रारूप' डोक्यावर घेतले त्यांत भगवती यांचा समावेश होतो. त्यामुळे दशकभरापूर्वी 'गुजरात प्रारूप'कर्त्यांकडे देशाची सूत्रे गेल्यानंतर अर्थव्यवस्थेसंबंधित काही महत्त्वाची जबाबदारी भगवती यांच्या हाती दिली जाईल असे मानले जात होते. ते का झाले नाही याची चर्चा नंतर कधी. तूर्तास भगवती यांनी भारत सरकारला केलेली सूचना महत्त्वाची ठरते. "जागतिक पुरवठा साखळीत (ग्लोबल सप्लाय चेन) भारताचा अंतर्भाव करावयाचा असेल तर सरकारला तातडीने पावले उचलावी लागतील", असे विधान भगवती करतात. या विधानास असलेली 'मेक इन इंडिया' या सरकारी कार्यक्रमाच्या दशकपूर्तीची पार्श्वभूमी लक्षात घेतल्यास भगवती यांच्या विधानाचे महत्त्व लक्षात येईल.

उमेदवार म्हणून एखादी निवडणूक लढवणे हे खरोखरच मेहनतीचे काम असते. त्याहूनही अवघड आणि गंभीर काम असते ते एखाद्या उमेदवाराच्या वतीने निवडणूक मोहीम राबवणे.राजकीय पक्षाच्या वतीने विधानसभा निवडणुकीचे निरीक्षक म्हणून काम करणे आणि प्रभारी बनणे हे एक जटिल काम असते.

# मी शिकलेले निवडणूक धडे!

वेगवेगळ्या अनेक कामांचा समावेश होतो. निवडणूक ही एखाद्या निर्णायक फुटबॉल सामन्यासारखी असते ज्यामध्ये एक विजेता ठरतो आणि त्याचा प्रतिस्पर्धी पराभूत ठरतो. कोणताही पक्ष निवडणूक जिंकतो किंवा हरतो. एखाद्या राजकीय पक्षाने जिंकलेल्या निवडणुकांपेक्षा हरलेल्या निवडणुकांची संख्या जास्त असते, तेव्हा थांबून विचार करण्याची वेळ आलेली असते.मी १९८४ मध्ये पहिल्यांदा लोकसभा निवडणूक लढवली. तिथून माझा राजकीय प्रवास खऱ्या अर्थाने सुरू झाला. त्यानंतर आजपर्यंत मी आठ लोकसभा निवडणुका लढवल्या आहेत आणि त्यापैकी सात वेळा जिंकला आहे. निवडणूक लढवण्याआधी आणि नंतरही मी अनेक निवडणूक मोहिमा राबवल्या आहेत. अजूनही माझ्या जिल्ह्यातील निवडणुकांवर माझी नजर असते. एक काळ असा होता की निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवाराचा चेहरा, बोलणे किंवा वागणे पुरेसे होते. पण आता तसे राहिलेले नाही. एक काळ असा



होता की उमेदवाराला त्या जातीतील बहुसंख्य लोकांची मते जिंकण्यासाठी त्या त्या जातीच्या नेत्याचा पाठिंबा मिळत असे, आणि तेवढे पुरेसे होते. पण आता तसे राहिलेले नाही. एक काळ असा होता की जाहीरनाम्याला फारसे महत्त्व नव्हते. आता तसे राहिलेले नाही. एक काळ असा होता जेव्हा 'नॅरेटिव्ह' हा शब्ददेखील राजकीय पक्षांना माहीत नव्हता. पण आजच्या काळात होणाऱ्या निवडणुकांसाठी तो त्याच्या असंख्य बारकाव्यांसह, अत्यंत महत्त्वाचा शब्द आहे. मेगाफोन, मायक्रोफोन, पोस्टर्स, पॅम्प्लेट्स, झेंडे आणि पताका ही एकेकाळी निवडणूक लढवण्याची महत्त्वाची साधनं होती. पण आता ती कालबाह्य झाली आहेत. समाजमाध्यमे, दूरदर्शनवरील जाहिराती, फेक न्यूज आणि 'पेड न्यूज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'पॅकेज'ची लाजिरवाणी पद्धत ही आताच्या काळातली नवीन शस्त्रे आहेत. सुदैवाने, सगळीच वृत्तपत्रे अशी नाहीत. काही सचोटीने वागतात. पण तरीही मला अशी धास्ती वाटते की दहा वर्षांच्या काळात निवडणुकांच्या संदर्भात वर्तमानपत्रांना काहीच महत्त्व उरणार नाही.मी गेला ५० वर्षांहून अधिक काळ निवडणुकांच्या संदर्भात झालेल्या नाट्यमय बदलांचा साक्षीदार आहे. पण एक गोष्टही तितकीच खरी आहे की काही गोष्टी मात्र आहे तशाच राहिलेल्या आहेत. त्या बदललेल्या नाहीत. आणि त्या तशाच कायम राहतील. राजकीय पक्षासाठी, न बदलणाऱ्या काही गोष्टी म्हणजे: शहर, जिल्हा आणि लहान लहान समित्या: पक्षाच्या राष्ट्रीय समितीची तीन महिन्यातून एकदा बैठक होणे पुरेसे नाही. शहर, जिल्हा, गट, प्रभाग आणि गाव समित्या हे या यंत्रणेचे आवश्यक घटक आहेत. त्यांचे हृदय २४ तास धडधडले पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# महायुतीला मोठं खिंडार!

## जानकर साथ सोडणार, सर्व 288 जागांवर उमेदवार उभे करणार

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाराष्ट्राच्या राजकारणात आता ट्विस्ट येण्याची शक्यता आहे. कारण राष्ट्रीय समाज पक्षाचे सर्वेसर्वा महादेव जानकर यांनी टोकाचा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर यांनी थेट महायुतीमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर हे राज्यातील विधानसभेच्या सर्व 288 जागा लढवण्यावर ठाम आहेत. ते प्रत्येक मतदारसंघात उमेदवार उभे करणार आहेत. त्यामुळे महायुतीची डोकेदुखी वाढण्याची जास्त शक्यता आहे. महादेव जानकर गेल्या काही दिवसांपासून महायुतीत नाराज असल्याची चर्चा सुरु होती.**



महायुतीच्या जागावाटपात आपल्याला विचारलं जात नाही, अशी महादेव जानकर यांची खंत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. महायुतीच्या जागावाटपात आपल्याला विचारात घेतलं जात नसल्यामुळे महादेव जानकर यांनी महायुतीमधून बाहेर पडण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर यांचा पक्ष सर्व 288 जागा लढवणार आहे. जानकर यांच्या पक्षाच्या उमेदवारांची पहिली यादी दोन दिवसांत जाहीर होणार आहे. महादेव जानकर यांच्या पक्षाला जागावाटपात विचारात घेतलं नाही म्हणून त्यांनी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर यांना धनगर समाजाचा मोठा पाठिंबा आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये महादेव जानकर यांच्या पक्षाची ताकद आहे. महादेव जानकर यांची सोलापूर, बारामती, मराठवाड्यातील काही भाग, परभणी, बीड, जालना आणि कर्नाटक लगतच्या प्रदेशात मोठी ताकद आहे. जिथे धनगर समाजाची संख्या जास्त आहे तिथे महादेव जानकर यांच्या पक्षाला चांगला पाठिंबा आहे. त्यामुळे जानकर यांनी महायुतीला सोडचिठ्ठी देणं हे महायुतीला डोकेदुखी ठरु शकतं. त्यामुळे जातीय समीकरणांचा विचार करता भाजपला महादेव जानकर यांची मनधरणी करण्यात यश येतं का? ते पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे. "काहीही नाही. मी कुणावर नाराज नाही. राष्ट्रीय समाज पक्ष देखील देशात मोठा पक्ष झाला पाहिजे. काँग्रेस आणि भाजपच्या लायकीत आला पाहिजे त्यासाठी आम्ही स्वतंत्र लढणार आहोत. आमची ताकद किती आहे, ते पाहण्यासाठी आम्ही लढणार आहोत. आम्ही सर्व 288 जागांवर लढणार आहोत", अशी प्रतिक्रिया महादेव जानकर यांनी दिली. "आमची महायुतीच्या नेत्यांसोबत जागावाटपाबाबत काहीच चर्चा नाही. त्यामुळे महायुती किंवा महाविकास आघाडी यांच्याबद्दल कोणतीही नाराजी नाही. आम्हाला आमच्या चौकात आमची औकात पाहायची आहे. त्यामुळे आम्ही स्वबळावर लढणार आहोत. महायुतीबरोबर आमचं काही नाही. त्यांचं आमचं संपलं आहे. आता सोबत जाण्याचा विचारच होऊ शकत नाही", अशी भूमिका महादेव जानकर यांनी मांडली."महायुती बरोबर होतो, आता महायुती बरोबर नाही. त्यांच्याबरोबर होतो तेव्हा त्यांनी लोकसभेला एक जागा दिली. अभिनंदन. आता आम्हाला आमची ताकद बघायची आहे. आमच्या पक्षाला मान्यता मिळवण्यासाठी कमीत कमी 12 आमदार किंवा 2 खासदार निवडून आणणं आवश्यक आहे. निवडणूक आयोगाच्या अटी पूर्ण करण्यासाठी आम्हाला आमचे दहा ते पंधरा आमदार निवडून आणले पाहिजेत. त्यामुळे आमच्या पार्लमेंट्री बोर्डाने स्वतंत्र निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. एवढंच नाही तर झारखंड विधानसभा निवडणुकीतही आमचा पक्ष निवडणूक लढवणार आहे.

### धनगर समाजाचा पाठिंबा

महायुतीच्या जागावाटपात आपल्याला विचारलं जात नाही, अशी महादेव जानकर यांची खंत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. महायुतीच्या जागावाटपात आपल्याला विचारात घेतलं जात नसल्यामुळे महादेव जानकर यांनी महायुतीमधून बाहेर पडण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर यांचा पक्ष सर्व 288 जागा लढवणार आहे. जानकर यांच्या पक्षाच्या उमेदवारांची पहिली यादी दोन दिवसांत जाहीर होणार आहे. महादेव जानकर यांच्या पक्षाला जागावाटपात विचारात घेतलं नाही म्हणून त्यांनी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर यांना धनगर समाजाचा मोठा पाठिंबा आहे.

# मनोज जरांगे मराठा समाजासाठी रस्त्यावर

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा मनोज जरांगे पाटलांना सल्ला

।अमरावती।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महायुतीमधील प्रमुख नेत्यांनी आज (१६ ऑक्टोबर) संयुक्त पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकारच्या मागील अडीच वर्षांच्या कारभाराचा लेखाजोखा मांडला. यावेळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी एकनाथ शिंदे यांना मराठा आरक्षणाचा तिढा आणि मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाविषयी प्रश्न विचारला.**




त्यावर ते म्हणाले, आमचं सरकार मराठा समाजाला आरक्षण देणार. या पत्रकार परिषदेत शिंदे यांना विचारण्यात आलं की महायुतीसमोर सध्या मनोज जरांगे यांचं मोठं आव्हान उभं आहे.

आचारसंहिता लागू होईपर्यंत मराठा आरक्षणाचा निकाल लागला नाही तर आम्ही वेगळा निर्णय घेऊ अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली होती. त्यामुळे निवडणुकीत महायुतीला मनोज जरांगे यांच्यामुळे मोठा फटका बसू शकतो का? यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "आम्ही बोलतो ते करतो. आम्ही मराठा समाजाला आरक्षण देणार आहोत. ओबीसी समाजाला किंवा इतर कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्ही मराठा समाजाला आरक्षण देणार".

एकनाथ शिंदे म्हणाले, "मी भर दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पायाची शपथ घेतली, त्यानंतर ताबडतोब विधानसभेचं अधिवेशन बोलावलं आणि मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलं.

### महाविकासने आरक्षण घालवलं

परंतु, ते आरक्षण रद्द करण्यासाठी न्यायालयात कोण गेलं हे सर्वांना माहिती आहे. त्या आरक्षणाविरोधातील याचिकाकर्ते कोण आहेत ते सर्वांना माहिती आहे. तरीदेखील आम्ही ते आरक्षण टिकवलं. यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने देखील मराठा समाजाला आरक्षण दिलं होतं. मात्र, महाविकास आघाडीने ते आरक्षण घालवलं. सर्वोच्च न्यायालयात त्या आरक्षणासाठी भक्कम बाजू मांडायला हवी होती, त्यासाठी पुरावे मांडायला हवे होते. मात्र, ते सरकार अपयशी ठरलं"."मराठा समाजाला न्याय मिळावा यासाठी मनोज जरांगे पाटील रस्त्यावर उतरले.

# 12 विमानांना बॉम्बने उडवण्याची धमकी!

## केंद्र सरकार सर्व परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून






। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांत विमानांमध्ये बॉम्ब ठेवल्याच्या अनेक धमक्याच्या देण्यात आल्याचा घटना समोर आल्या आहेत. अशा प्रकारच्या धमक्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या तीन ते चार दिवसांत बॉम्बने विमान उडवण्याची धमकी देण्यात आल्याची जवळपास १२ वी घटना घटली. या अशा प्रकाराच्या घटनांची केंद्र सरकारने आता गंभीर दखल घेतली आहे.**

दरम्यान, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी या घटनांवर प्रतिक्रिया देताना अशा प्रकारच्या विघ्नकारी कृत्यांबद्दल चिंता असल्याचं म्हणत या धमक्यांचा निषेध केला. मंत्री राम मोहन नायडू यांनी बुधवारी या घटनांवर आता प्रतिक्रिया दिली. बुधवारी त्यांनी सांगितलं की, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी बॉम्बच्या धमकीच्या सर्व प्रकरणांचा सक्रियपणे तपास करत आहेत. तसेच सरकार देखील सर्व परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. गेल्या काही दिवसांत अनेक विमानांना बॉम्बच्या धमक्यांचा सामना करावा लागला आणि त्यानंतर या धमक्या खोट्या ठरल्या. या प्रकरणात मुंबई पोलिसांनी एका अल्पवयीन मुलाला अटक केली असल्याची माहिती मंत्री राम मोहन नायडू यांनी दिली. दरम्यान, आज अकासा या विमान कंपनीचं विमान बंगळुरुला जाण्यासाठी निघालं होतं, पण ते नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी विमानतळावर परतलं. विमानात बॉम्ब असल्याची धमकी आल्याने हे विमान दिल्लीला परतलं. मागच्या तीन दिवसांतली ही १२ वी धमकी (BOMB THREAT) आहे. अकासा एअरलाईन्सच्या या विमानात १७४ प्रवासी बसले होते, त्यामध्ये तीन नवजात अर्भकं आणि सात क्रू मेंबर्सचाही समावेश होता.त्याआधी मंगळवारी एअर इंडिया एक्स्प्रेसच्या एका विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर ते विमान उत्तर प्रदेशातील महर्षि वाल्मिकी विमानतळावर या विमानाचे आप्तकालीन लँन्डिंग करण्यात आले होते. तर दुसरीकडे मंगळवारीच दिल्लीवरून शिकागोला जाणाऱ्या एका एअर इंडियाच्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर दिल्लीवरून शिकागोला जाणाऱ्या विमानाचे कॅनडामध्ये आप्तकालीन लँन्डिंग करण्यात आले होते. दरम्यान, विमानात बॉम्ब असल्याच्या अशा प्रकारच्या धमक्यानंतर आता केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली आहे.जयपूर ते बंगळुरूमार्गे अयोध्या (IX765) एअर इंडिया एक्सप्रेस फ्लाइट, दरभंगा ते मुंबई (SG११६) स्पाईसजेट फ्लाइट, बागडोगरा ते बंगळुरू (QP१३७३) आकाशा एअर फ्लाइट, दिल्ली ते शिकागो (AI १२७) एअर इंडियाचे फ्लाइट, दम्मम (सौदी अरेबिया) ते लखनौ (6E ९८) इंडिगो फ्लाइट, अलायन्स एअर अमृतसर-डेहराडून-दिल्ली फ्लाइट (९I ६५०) आणि एअर इंडिया एक्सप्रेस फ्लाइट (IX ६८४) मदुराई ते सिंगापूर.दरम्यान, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी या घटनांवर प्रतिक्रिया देताना अशा प्रकारच्या विघ्नकारी कृत्यांबद्दल चिंता असल्याचं म्हणत या धमक्यांचा निषेध केला.

### विमानाचे आप्तकालीन लँन्डिंग

विमानात बॉम्ब असल्याची धमकी आल्याने हे विमान दिल्लीला परतलं. मागच्या तीन दिवसांतली ही १२ वी धमकी (BOMB THREAT) आहे. अकासा एअरलाईन्सच्या या विमानात १७४ प्रवासी बसले होते, त्यामध्ये तीन नवजात अर्भकं आणि सात क्रू मेंबर्सचाही समावेश होता.त्याआधी मंगळवारी एअर इंडिया एक्स्प्रेसच्या एका विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर ते विमान उत्तर प्रदेशातील महर्षि वाल्मिकी विमानतळावर या विमानाचे आप्तकालीन लँन्डिंग करण्यात आले होते. तर दुसरीकडे मंगळवारीच दिल्लीवरून शिकागोला जाणाऱ्या एका एअर इंडियाच्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली होती.

### एका अल्पवयीन मुलाला अटक

मंत्री राम मोहन नायडू यांनी बुधवारी या घटनांवर आता प्रतिक्रिया दिली. बुधवारी त्यांनी सांगितलं की, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी बॉम्बच्या धमकीच्या सर्व प्रकरणांचा सक्रियपणे तपास करत आहेत.गेल्या काही दिवसांत अनेक विमानांना बॉम्बच्या धमक्यांचा सामना करावा लागला आणि त्यानंतर या धमक्या खोट्या ठरल्या. या प्रकरणात मुंबई पोलिसांनी एका अल्पवयीन मुलाला अटक केली असल्याची माहिती मंत्री राम मोहन नायडू यांनी दिली.दरम्यान, आज अकासा या विमान कंपनीचं विमान बंगळुरुला जाण्यासाठी निघालं होतं, पण ते नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी विमानतळावर परतलं.

# न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी हटवली

## न्यायदेवतेच्या हातात तलवारीऐवजी भारतीय संविधान





। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बऱ्याचदा आपण चित्रपटांमधील न्यायालयातील प्रसंगांमध्ये न्यायदेवतेचा (LADY OF JUSTICE) पुतळा पाहिला आहे. यामध्ये न्यायदेवतेच्या एका हातात तलवार, तर दुसऱ्या हातात तराजू दिसतो. तसेच या न्यायदेवतेच्या डोळ्यांवर पट्टी बांधलेली आपण पाहिली आहे. मात्र, आता न्यायालयांमध्ये न्यायदेवतेचा नवा पुतळा पाहायला मिळू शकतो.**


न्यायदेवतेची नवी मूर्ती पांढऱ्या शुभ्र रंगाची आहे.ही मूर्ती भारतीय वेशभूषेत आहे. साडी, डोक्यावर मुकूट, कपाळावर टिकली, कानात व गळ्यात पारंपरिक आभूषणं दिसत आहेत. न्यायदेवतेच्या एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात संविधान आहे.न्यायालयातील न्यायाधीशांसाठीच्या ग्रंथालयातील न्यायदेवतेचा पुतळा (NEW LADY OF JUSTICE) बदलण्यात आला आहे. या पुतळ्यामध्ये काही बदल करण्यात आले आहेत. यापैकी प्रमुख बदल म्हणजे न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी हटवण्यात आली आहे. तसेच तिच्या एका हातात तराजू तर दुसऱ्या हातात तलवारीऐवजी भारतीय संविधान दिसत आहे. ऑल इंडिया रेडिओ न्यूजने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे.
न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी हटवून न्यायदेवता अंध नाही/ कायदा अंध नाही असा संदेश देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच कायदा व्यवस्था भारतीय संविधानावर आधारित असल्याचं नमूद करण्यासाठी न्यायदेवतेच्या हातातील तलवारीची जागा आता भारतीय संविधानाने घेतली आहे.आधी न्यायदेवतेच्या डोळ्यांवर पट्टी होती. ही पट्टी म्हणजे समानतेचं प्रतीक मानलं जात होती. याचाच अर्थ न्यायालयासमोर सर्वजण सारखेच आहेत. नेता, सेलिब्रेटी, श्रीमंत, गरीब असा भेदभाव न्यायदेवता करत नाही. तर हातातील तलवार ही गुन्हेगारांना शिक्षा देण्याची शक्ती दर्शवते. एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या आदेशानुसार सर्वोच्च न्यायालयातील ग्रंथालयात नवी मूर्ती ठेवण्यात आली आहे. भारताने अलीकडेच ब्रिटीशकालीन इंडियन पीनल कोड कायद्यांमध्ये बदल करून भारतीय न्याय संहिता कायदा लागू केला आहे.

### ही मूर्ती भारतीय वेशभूषेत आहे

न्यायदेवतेच्या मूर्तीमधील बदल हा त्याचाच एक भाग मानला जात आहे. भारतातील न्यायदेवतेच्या जुन्या मूर्तीची प्रेरणा ग्रीक संस्कृतीतून घेण्यात आली आहे. तिथल्या संस्कृतीत थेमिस ही न्यायाची देवता आहे. तिच्या एका हातात तराजू तर, दुसऱ्या हातात तलवार आहे. अनेक न्यायालयांमध्ये भारतीय व ग्रीक तत्त्वज्ञानानाचं मिश्रण करून तयार केलेली न्यायदेवतेची मूर्ती पाहायला मिळते.न्यायदेवतेची नवी मूर्ती पांढऱ्या शुभ्र रंगाची आहे. ही मूर्ती भारतीय वेशभूषेत आहे.

# ट्रोल करणाऱ्यांना प्रिया बापटचं सडेतोड उत्तर

मराठी मनोरंजनसृष्टीतील सेलिब्रिटी हे चाहत्यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्य वाटत असतात. या सेलिब्रिटींची एखादी कृती चाहत्यांना खटकते आणि त्यानंतर त्यांना प्रचंड ट्रोल करण्यात येतं. काही दिवसांपूर्वी अभिनेत्री प्रिया बापट (PRIYA BAPAT) ऑस्ट्रेलियाला फिरायला गेली होती. त्यावेळी तिने बिकिनीतील फोटो शेअर केले होते. हे फोटो शेअर केल्यानंतर काही चाहत्यांनी अभिनेत्रीच्या धाडसाचं कौतुक केलं. तर दुसरीकडे मात्र काहींनी तिला चांगलं ट्रोल केलं. पण त्यावेळी या चाहत्यांना अभिनेत्रीने काहीही उत्तर दिलं नाही. आता नुकत्याच एका मुलाखतीत अभिनेत्रीने याप्रकरणावर तिचं मत मांडलं आहे. राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीत प्रिया बापट म्हणाली,"ऑस्ट्रेलियामधील बिकिनीतील फोटो शेअर केल्यानंतर मी प्रचंड ट्रोल झाले. पण त्यावेळी मी शांत राहणं पसंत केलं. दुसरीकडे माझ्याच काही चाहत्यांनी माझी बाजू घेतली. मला असं वाटतं, आपण खूप सोयीस्कररित्या मराठी संस्कृतीचे झेंडे घेऊन फिरतो. मला ही गोष्ट आवडत नाही. मी कोणते कपडे घालावेत यावरुन आपली संस्कृती नाही ठरत". प्रिया बापट म्हणाली,"माझं वागणं, माझे आचार-विचार, माझ्या घरच्यांची शिकवण, मी चार लोकांसोबत कशी बोलते, त्यांच्यासोबत कशी वागते, मी माझं काम प्रामाणिकपणे करते की नाही यावर माझा सुसंस्कृतपणा ठरतो. माझ्या कपड्यांवर ठरत नाही. ज्यांना मी साडी नेसली म्हणजे चांगली आणि बिकनी घातली म्हणजे वाईट असं ज्यांना कोणाला वाटत असेल तर मला त्यांना उत्तरंचं द्यावसं वाटत नाही. मुळातच कोणत्याही व्यक्तीसाठी ती व्यक्ती चांगली आहे की वाईट आहे, ती सुसंस्कृत आहे की असंस्कृत आहे हे ठरवण्यासाठी कपडे हे अत्यंत चुकीचा क्रायटेरिया आहे. माझ्याकडे काम नाही म्हणून मी असे फोटो शेअर केले असंही बऱ्याच जणांनी म्हटलं आहे. बिकीनीतील फोटो शेअर केल्यानंतर मला काम मिळेल असं त्यांचं मत होतं. पण खरंतर बिकीनी घातली म्हणजे काम मिळेल असं या इंडस्ट्रीत होत नाही". प्रिया पुढे म्हणाली,"मी माझ्या



आवडीसाठी बिकीनी घातली होती. आपल्या प्रत्येकाचे बेंचमार्क असतात. आज मला माझ्या शरीराबद्दल आत्मविश्वास आहे. मी जशी आहे तशी वावरू शकते. प्रत्येकाचा एक बॉडी टाईप असतो. मी स्वत:ला आवडते हे कळायला मला थोडा वेळ लागला. मी स्वत:ला बिकिनीमध्ये आवडले म्हणून मी ते फोटो शेअर केले. बाकी कोणाला ते आवडावे हा मुद्दाच नव्हता. चाहत्यांना तुम्ही घरातले वाटतात. त्यामुळे ते हक्काने कमेंट्स करत असतात. पण मला किंवा माझ्या घरच्यांना मी केलेली गोष्ट चूक आहे असं वाटत नाही तोपर्यंत मी या गोष्टीचा फार विचार करत नाही.

# माधुरी निवडणूक लढवण्याच्या चर्चा

अभिनेत्री माधुरी दीक्षित सध्या चर्चेत आहेत. माधुरी दीक्षित-नेने आता लवकरच भाजपकडून (BJP) निवडणूक लढवणार असल्याची चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. मात्र सध्या अशी कोणतीच चर्चा भाजपमध्ये सुरु नसल्याची माहिती भाजपच्या वरिष्ठ नेत्याने एबीपी माझाला दिली आहे. अभिनेत्री माधुरी दीक्षित भाजपकडून लोकसभा निवडणूक लढवणार असल्याची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. याआधीदेखील अशीच चर्चा रंगली होती. पण सध्या तरी राजकारणात प्रवेश करण्याचा माझा विचार नाही, असं म्हणत माधुरी दीक्षित यांनी या चर्चांना पूर्णविराम दिला होता. पण आता पुन्हा एकदा या चर्चांना सुरुवात झाली आहे. पण अशी कोणतीच चर्चा भाजपमध्ये सुरू नसल्याची माहिती भाजपच्या वरिष्ठ नेत्याने एबीपी माझाला दिली आहे. तसेच लोकसभेचं तिकीट कोणाला द्यायचं हा सर्वस्वी निर्णय केंद्रातून होणार नाही. लोकसभा निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे आता सर्वच राजकीय पक्षांकडून निवडणूकीची जोरदार तयारी सुरू झाली आहे. आता धकधक गर्ल लोकप्रिय अभिनेत्री माधुरी दीक्षित निवडणुकीच्या रिंगणार उतरणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. माधुरी दीक्षितला भाजपातर्फे तिकीट मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही महिन्यांपूर्वी गणेशोत्सवादरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबईत आले होते. त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सागर' या शासकीय निवासस्थानी त्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत लोकसभा निवडणुकीसंदर्भात चर्चा झाली.

# अंकिता देणार गोड बातमी?

'बिग बॉस 17' (BIGG BOSS 17) या कार्यक्रमाची स्पर्धक अंकिता लोखंडे (ANKITA LOKHANDE) सध्या प्रेग्नंसीच्या बातम्यांमुळे चर्चेत आहे. अंकिताचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये अभिनेत्री म्हणत आहे की तिला पाळी आलेली नाही. तसेच तिची प्रेग्नंसी टेस्टदेखील झाली आहे. विकीसोबत बोलतानाचा अंकिताचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'बिग बॉस 17'मधील चर्चेत असणाऱ्या व्यक्तींमध्ये अंकिता लोखंडेचा समावेश आहे. विकी जैन ते सुशांत सिंह राजपूतपर्यंत (SUSHANT SINGH RAJPUT) वेगवेगळ्या विषयांवर अंकिताने या घरात भाष्य केलं आहे. पण आता 'बिग बॉस 17'च्या घरात अंकिताला मळमळ आणि उलट्यांचा त्रास व्हायला लागला आहे. तसेच आंबट पदार्थ खाण्याची इच्छा होत आहे. अंकिताला पाळीदेखील आलेली नाही". अंकिता लोखंडेचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये अंकिता विकीला सांगत आहे की,"सध्या मी खूप कन्फ्यूज आहे. माझी प्रेग्नंसी टेस्ट देखील झाली आहे. प्रेग्नंसी टेस्टसह ब्लड टेस्ट आणि यूरिन प्रेग्नंसी टेस्टदेखील झाली आहे. मला पाळीदेखील आलेली नाही. मी खरचं प्रेग्नंट आहे की नाही हे मला माहिती नाही. पण आता मला घरी जायचं आहे". अंकिता लोखंडे आणि विकी जैन यांना 'बिग बॉस'च्या घरात वेगवेगळ्या खोल्यांमध्ये शिफ्ट करण्यात आले आहे. अंकिता सुरुवातीपासून 'दिल' या खोलीत आहे. पण विकीला आता दिलमधून 'दिमाग' या खोलीत शिफ्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अंकिता नाराज असून या कारणाने त्यांच्यात भांडणदेखील झालं आहे.



# मेरी क्रिसमस'ची रिलीज डेट ढकलली पुढे

दाक्षिणात्य सुपरस्टार विजय सेतुपती (VIJAY SETHUPATHI) आणि बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ (KATRINA KAIF) काही दिवसांपासू त्यांच्या आगामी 'मेरी क्रिसमस' (MERRY CHRISTMAS) या सिनेमामुळे चर्चेत आहेत. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पण आता या सिनेमाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली आहे. 'मेरी क्रिसमस' या सिनेमाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली आहे. 'मेरी क्रिसमस' हा सिनेमा आधी 15 डिसेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार होता. पण नंतर या सिनेमाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली. 8 डिसेंबरला हा सिनेमा रिलीज होणार असल्याचं जाहीर करण्यात आलं. पण आता पुन्हा या सिनेमाची रिलीज डेट बदलण्यात आली आहे. कतरिना कैफ आणि विजय सेतुपती यांचा 'मेरी क्रिसमस' हा सिनेमा सध्या चर्चेत आहे. वारंवार या सिनेमाची रिलीज डेट बदलण्यात येत आहे. आता पुन्हा एकदा या सिनेमाची रिलीज डेट बदलण्यात आली आहे. आता या सिनेमासाठी प्रेक्षकांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. कतरिना आणि विजय यांचा 'मेरी क्रिसम हा सिनेमा 8 डिसेंबरला नव्हे तर 2024 च्या जानेवारीत प्रदर्शित होणार आहे.



# आलिया भट्टने घातला महागडा ड्रेस

लोकप्रिय कार्यक्रम 'कॉफी विथ करण 8' (KOFFEE WITH KARAN 8) नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या कार्यक्रमाच्या आगामी भागात बॉलिवूड अभिनेत्री करीना कपूर (KAREENA KAPOOR) आणि आलिया भट्ट (ALIA BHATT) हजेरी लावणार आहेत. 'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमासाठी करीना आणि आलियाने महागडा ड्रेस परिधान केला आहे. 'कॉफी विथ करण 8'च्या चौथ्या भागात बॉलिवूड अभिनेत्री करीना कपूर आणि आलिया भट्ट हजेरी लावणार आहेत. दोघीही आघाडीच्या बॉलिवूड अभिनेत्री असल्या तरी करीना नात्याने आलियाची नणंद आहे. या कार्यक्रमाच्या आगामी भागाचा एक प्रोमो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. प्रोमोमध्ये आलिया आणि करीनाचा फॅशनेबल लूक पाहायला मिळत आहे. आलिया भट्टने करीना कपूरसोबत स्क्रीन शेअर करताना चॉकलेटी रंगाचा शिमरी गाउन परिधान केला होता. फिगर फिटिंगच्या या स्टायलिश ड्रेसने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. आलियाने हा शिमर ड्रेस लूक पूर्ण करण्यासाठी या ड्रेसवर मॅचिंग हील्स घातले होते. आलियाचा हा ड्रेस भाव खाऊन गेला आहे. करीना कपूरच्या ड्रेसनेदेखील चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. करीनानेदेखील स्टायलिश लूक केला होता. ब्लॅक अॅन्ड व्हाइट मोनोक्रोमॅटिक लूकमध्ये बेबो खूपच सुंदर दिसत होती. तिने पांढऱ्या रंगाचा ऑफ शोल्डर टॉप आणि फिगर फिटिंग डिटेलिंग असलेली मैक्सी स्कर्ट परिधान केला होता. 'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमासाठी आलिया भट्ट आणि करीना कपूरने महागडा ड्रेस परिधान केला होता. आलियाने घातलेल्या चॉकलेटी रंगाच्या शिमरी ड्रेसची किंमत 1550 डॉलर म्हणजेच जवळपास 1.28 लाख रुपये आहे. तर करीना कपूरने घातलेल्या ड्रेसचे किंमत 74 हजार रुपये आहे. आलिया भट्ट आणि करीना कपूरचा ड्रेस तुम्हाला आवडला असेल आणि तुम्हाला हा लूक कॉपी करायचा असेल तर त्यांच्या कपड्यांच्या किंमती जाणून तुम्ही हैराण व्हाल.

# “भारताबद्दल बोलण्यावर बंदी”!

## पाकिस्तानच्या कर्णधाराचे खळबळजनक वक्तव्य

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**इमर्जिंग एशिया कप २०२४ चे आयोजन यंदा ओमानमध्ये केले जाणार आहे. ज्यामध्ये भारत आणि पाकिस्तानसह अनेक आशियाई देश सहभागी होणार आहेत. भारत अ व्यतिरिक्त पाकिस्ताननेही संघ जाहीर केला आहे. मोहम्मद हारिस या स्पर्धेत पाकिस्तान अ संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सांभाळणार आहे. मात्र सध्या चर्चेत असलेली ही स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच त्याने एक मोठं विधान केलं आहे.**



पाकिस्तानच्या अ संघाचा कर्णधार मोहम्मद हरिसने स्पर्धेपूर्वी एक मोठा खुलासा केला आहे. इमर्जिंग आशिया कप २०२४ साठी त्याच्या संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल बोलण्यास बंदी असल्याचे त्याने म्हटले आहे. सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये हरिस म्हणतो की आमच्या ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल बोलण्यास बंदी घालण्याची ही पहिलीच वेळ असेल. त्याने कबूल केले की जेव्हा आमच्या ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल चर्चा होते तेव्हा त्यांच्या खेळाडूंवर जास्त दबाव जाणवतो.१९ ऑक्टोबरला पाकिस्तान वि भारत यांच्यात टूर्नामेंटमधील पहिला सामना होणार आहे. भारत पाकिस्तानच्या गटात ओमान आणि युएई हे दोन संघ आहेत. भारत-पाकिस्तानशिवाय या स्पर्धेत इतर आशियाई संघही आहेत. हारिस या व्हायरल व्हीडिओमध्ये म्हणातोय की, “मी तुम्हाला एक सांगू का, पहिल्यांदाच असं होईल की आमच्या ड्रेसिंग रूममध्ये भारताविषयी चर्चा करण्यावर बंदी घाचली आहे.” २३ वर्षीय मोहम्मद हारिस हा पाकिस्तानच्या सिनियर संघातूनही खेळला आहे. त्याने पाकिस्तानसाठी ६ वनडे सामने आणि ९ टी-२० सामने खेळले आहेत.हारिस भारताविषयी प्रश्न विचारल्यावर म्हणाला, “आम्हाला फक्त भारताचा विचार करायचा नाहीय तर आम्हाला इतर संघांविषयी देखील विचार करावा लागतो. मी पाकिस्तानच्या वरिष्ठ संघात होतो, गेल्या विश्वचषकातही मी खेळलो. यामुळे इतका दबाव निर्माण होतो की तुम्ही मानसिकदृष्ट्या फक्त भारताचाच विचार करता. आम्हाला इतर संघांचीही सामना करावा लागेल. त्यामुळे सध्या ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल बोलण्यास बंदी आहे.आम्ही ड्रेसिंग रूममध्ये आता भारताविषयी बोलतच नाही. फक्त भारतचं नाही आम्हाला इतरही संघांचा विचार करावा लागेल.”इमर्जिंग आशिया कपमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व तिलक वर्मा करणार आहे. त्याच्याशिवाय अभिषेक शर्मा आणि प्रभसिमरन सिंग यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे. या खेळाडूंनी आयपीएलमध्ये अप्रतिम कामगिरी केली होती. गेल्या वेळी यश धुलने इमर्जिंग आशिया कपमध्ये भारताची कमान सांभाळली होती. मात्र, अंतिम फेरीत भारताचा पराभव करत पाकिस्तानने विजेतेपद पटकावले होते.पाकिस्तानच्या अ संघाचा कर्णधार मोहम्मद हरिसने स्पर्धेपूर्वी एक मोठा खुलासा केला आहे. इमर्जिंग आशिया कप २०२४ साठी त्याच्या संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल बोलण्यास बंदी असल्याचे त्याने म्हटले आहे. सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये हरिस म्हणतो की आमच्या ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल बोलण्यास बंदी घालण्याची ही पहिलीच वेळ असेल. त्याने कबूल केले की जेव्हा आमच्या ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल चर्चा होते तेव्हा त्यांच्या खेळाडूंवर जास्त दबाव जाणवतो.१९ ऑक्टोबरला पाकिस्तान वि भारत यांच्यात टूर्नामेंटमधील पहिला सामना होणार आहे. भारत पाकिस्तानच्या गटात ओमान आणि युएई हे दोन संघ आहेत. भारत-पाकिस्तानशिवाय या स्पर्धेत इतर आशियाई संघही आहेत. हारिस या व्हायरल व्हीडिओमध्ये म्हणातोय की, “मी तुम्हाला एक सांगू का, पहिल्यांदाच असं होईल की आमच्या ड्रेसिंग रूममध्ये भारताविषयी चर्चा करण्यावर बंदी घाचली आहे.” २३ वर्षीय मोहम्मद हारिस हा पाकिस्तानच्या सिनियर संघातूनही खेळला आहे. त्याने पाकिस्तानसाठी ६ वनडे सामने आणि ९ टी-२० सामने खेळले आहेत.हारिस भारताविषयी प्रश्न विचारल्यावर म्हणाला, “आम्हाला फक्त भारताचा विचार करायचा नाहीय तर आम्हाला इतर संघांविषयी देखील विचार करावा लागतो.

### इतरही संघांचा विचार करावा

मी पाकिस्तानच्या वरिष्ठ संघात होतो, गेल्या विश्वचषकातही मी खेळलो. यामुळे इतका दबाव निर्माण होतो की तुम्ही मानसिकदृष्ट्या फक्त भारताचाच विचार करता. आम्हाला इतर संघांचीही सामना करावा लागेल. त्यामुळे सध्या ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल बोलण्यास बंदी आहे.आम्ही ड्रेसिंग रूममध्ये आता भारताविषयी बोलतच नाही. फक्त भारतचं नाही आम्हाला इतरही संघांचा विचार करावा लागेल.”इमर्जिंग आशिया कपमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व तिलक वर्मा करणार आहे. त्याच्याशिवाय अभिषेक शर्मा आणि प्रभसिमरन सिंग यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

# IND vs NZ कसोटी मुंबईतील वानखेडेमध्ये होणार

## मॅचची तिकिटे स्वस्त; 18 ऑक्टोबरपासून म्हणजेच शुक्रवारपासून सुरु होणार?

। नवी दिल्ली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत वि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. पहिला कसोटी सामना १६ ऑक्टोबर रोजी बंगळुरू येथे सुरू होणार होता, पण बंगळुरूमधील पावसामुळे पहिल्या दिवशी लंच ब्रेकपर्यंत नाणेफेक झालेली नाही. त्यामुळे हवामानाचा अंदाज पाहता पहिल्या कसोटीत किती दिवस सामना खेळवला जाईल, याबाबत शंका आहे. पुणे येथे तिसरा कसोटी सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.**




कसोटी सामन्याची तिकिटं कधी विकली जाणार, याबाबत माहिती समोर आली आहे. मुंबईच्या प्रसिद्ध वानखेडे स्टेडियमवर १ ते ५ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या तिसऱ्या कसोटीसाठी ऑनलाईन तिकिट विक्री येत्या १८ ऑक्टोबरपासून म्हणजेच शुक्रवारपासून सुरू होणार असल्याची अधिकृत घोषणा मुंबई क्रिकेट असोसिएशनने केली आहे. एमसीएच्या सर्वोच्च परिषदेच्या बैठकीनंतर ही घोषणा करण्यात आली. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील मुलांना आणि हॅरिस आणि जाईल्स शिल्ड स्पर्धेच्या उपांत्य फेरीतील मुलांमधील खेळाप्रति प्रेम वाढावे यासाठी या कसोटी सामन्यासाठी मोफत पास वाटप करण्यावर सर्वानुमते एकमत देण्यात आले. हा प्रस्ताव एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी मांडला होता.डिसेंबर २०२१ नंतर म्हणजेच तीन वर्षांनंतर मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर भारत-न्यूझीलंड कसोटी सामना खेळवला जाणार आहे, तिकिटांच्या दराबद्दल बोलायचं तर नॉर्थ स्टँड, सचिन तेंडुलकर स्टँड आणि विजय मर्चंट स्टँड, जे सर्वसामान्यांसाठी खुले आहेत, त्याची किंमत १५०० रुपये आहे.

### सुनील गावस्कर स्टँडसाठी 325 रुपये

सुनील गावस्कर स्टँडसाठी, ३२५ रुपये आणि पूर्वकडील वरच्या भागासाठी ६२५ रुपये तिकिटांची किंमत आहे. ही किंमत धोरणे अशा हाय-प्रोफाइल सामन्यांच्या होस्टिंगशी संबंधित खर्चासह प्रवेशयोग्यता संतुलित करण्याचा प्रयत्न दर्शवतात.कसोटी सामन्याची तिकिटं कधी विकली जाणारतिसऱ्या कसोटीसाठी ऑनलाईन तिकिट विक्री येत्या १८ ऑक्टोबरपासून म्हणजेच शुक्रवारपासून सुरू होणार असल्याची अधिकृत घोषणा मुंबई क्रिकेट असोसिएशनने केली आहे.